MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात

## भारताचा कोहिनूर हरपला! उद्योगपती रतनजी टाटा यांचे निधन, वयाच्या ८६ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

देशातील प्रसिद्ध उद्योगपती रतनजी टाटा यांचे निधन झाले असून मुंबईतील ब्रीचकँडी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु होते. / रतनजी टाटा यांचा जीवनप्रवास : ❋ रतन टाटांचा जन्म २८ डिसेंबर १९३७ ❋ जमशेदजी टाटा यांनी त्यांना दत्तक घेतलं ❋ मुंबईच्या कॅम्पियन शाळेत शिक्षण ❋ १९५५ मध्ये पदवी प्राप्त केली ❋ १९५९ मध्ये आर्किटेक्चरमध्ये बॅचलर पदवी ❋ कार्नेल विद्यापीठातून केलं शिक्षण पूर्ण ❋ हार्वर्ड विद्यापीठातून मॅनेजमेंटची पदवी ❋ १९६२ मध्ये रतन टाटा समूहात दाखल ❋ १९७१ मध्ये नेल्को कंपनीची धुरा सांभाळली ❋ १९८१ मध्ये टाटा इंडस्ट्रीची सूत्र सोपवली ❋ १९९० ते २०१२ मध्ये टाटा समूहाचे अध्यक्ष ❋ ऑक्टो. २०१६ ते फेब्रु. २०१७ टाटाचे अंतरिम अध्यक्ष ❋ २००४ मध्ये टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस सार्वजनिक केली ❋ २००९ मध्ये सामान्यांसाठी नॅनो कारचं लाँचिंग ❋ कोरस, जग्वार, टेटली कंपन्यांची खरेदी ❋ भारत सरकारकडून 'पद्मविभूषण' आणि 'पद्मभूषण' पुरस्कार ❋ 'ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया आंतरराष्ट्रीय सन्मान' ❋ 'ऑर्डर ऑफ ब्रिटिश सन्मान'ही प्राप्त ❋ २८ डिसेंबर १९३७ साली जन्म झालेले रतन टाटा,अविवाहित होते – रतन टाटा यांचे,३८०० कोटींचे,व्यावसायिक साम्राज्य – आपल्या संपत्तीतील ६५ टक्के संपत्ती,रतन टाटा यांनी समाजकार्यासाठी,दान दिली – या दशकातील सर्वात दानशूर व्यक्ती म्हणून,रतन टाटा यांचा आदराने उल्लेख केला जातो – रतन टाटा यांनी १९६१ साली,टाटा समूहात काम सुरू केलं – टाटा स्टील या कंपनीत शॉप फ्लोअर वर त्यांनी प्रथम काम केलं वारसदार म्हणून ४ नावं चर्चेत – रतन टाटा यांचे अत्यंत निकटवर्तीय आणि त्यांचे चुलतभाऊ नोएल टाटा – टाटा गृपमधिल अनेक कंपन्यांतील एक महत्वाचे नाव असलेल्या,३४ वर्षीय माया टाटा – स्टार बाजारचे प्रमुख ३२ वर्षीय नेविल टाटा – इंडीयन हॉटेलचे प्रमुख ३९ वर्षीय लीह टाटा– – संकलन –श्याम पिंपळे पुणे बीड ७२४९४११९४५ –

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –२३ | गुरूवार दि.१० ऑक्टोबर २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -23 | THURSDAY DT.10 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# तुफानातल्या दिव्यासमोर विझलेल्या दिव्याला किंमत आहे का?

## सुरेश नवलेना पडू लागले बीड विधानसभेतून मीच आमदार होणार म्हणून स्वप्न?



- माजी मंत्री सुरेश नवले चे बीड शहरामध्ये बॅनर लावले त्यावर बिडकारांच्या चर्चेला उधान ?
- सुरेश नवले नी बीड शहरातील अनेक भागांमध्ये स्वताच्या भावाच्या माध्यमातून गुत्तेदारी केलेली उघड आहे. त्यामध्ये फक्त गुत्तेदारीसाठी सुरेश नवले वेगवेगळ्या पक्षाच्या संपर्कात या अगोदर सुद्धा होते?
- माजी मंत्री सुरेश नवले यांच्या पाठीमागे बीड मतदारसंघांमधील किती जनता आहे संवाद दौरा त्यांनी काढून भूमिका स्पष्ट करत शक्तिप्रदर्शन करणे गरजेचे? सुरेश नवले यांना क्षीरसागर अनिल जगताप कुंडलिक खांडे राजेंद्र मस्के अशोक हिंगे बाजीराव चव्हाण यांच्या एवढं काम व जनसंपर्क असलेले नेते सुरेश नवले आहेत का असा प्रश्न बीड मतदारसंघातील जनतेला पडलेला?
- सुरेश नवले यांची आमदारकीची उडी म्हणजे राजकीय तळजोडीमध्ये आपली गुत्तेदारी साबूत ठेवण्यासाठी केविलवाणा प्रयत्न?
- बीड शहराच्या अनेक भागात विकास कामांमध्ये खोडा घालण्यामध्ये सर्वात मोठे शर्तीचे प्रयत्न करणारे माजी मंत्री सुरेश नवले यांना बीडची जनता वेढी वाटली का?
- सुरेश नवले ला कोणत्याच पक्षाची उमेदवारी मिळणार नाही हे लक्षात आल्यानंतर मराठा समाज बांधवांमध्ये आज जवळजवळ उमेदवारीसाठी धडपड करण्याचा प्रयत्न अयशस्वी?

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये महाराष्ट्रामध्ये मराठा ओबीसी वादा नंतर सर्वात जास्त जातीयवाद कुठे झाला असेल तर तो फक्त बीड जिल्ह्यामध्ये झालेला आहे आणि बीड विधानसभेमधून आता तर नव्याच चर्चेला उदान आलेल आहे माझी मंत्री राहिलेले बीडचे एकेकाळी शिवसेनेचा बालेकिल्ला चालवत असलेले सुरेश नवले यांनी शिवसेनेला गद्दारी करत काँग्रेसमध्ये नारायण राणे यांच्यासोबत गेले आणि नारायण राणे यांनी शिवसेनेमधून बाहेर पडल्यानंतर नारायण राणे यांच्यासोबत घरोबा करत विधान परिषदेचे आमदारकी मिळवली परंतु त्यानंतर त्यांनी नारायण राणे यांना सोडून सोडून दिले व नंतर त्यांनी वेगवेगळ्या पक्षांमध्ये आपलं नशीब आजमिविण्याचा प्रयत्न केला परंतु सुरेश नवले यांनी बीड शहरामध्ये अनेक विकास कामांना खोडा घालण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे

यामध्ये क्षीरसागर असतील किंवा शिवसेनेचे मराठा समाजाचे वेगवेगळे पक्षाचे नेते असतील त्यांना सदैव सुरेश नवले यांनी विरोधच केलेला आहे सुरेश नवले यांना अहंकाराचा गर्वाचा खूप मोठा वाटा त्यांच्या नशिबी आलेला आहे स्वतःचा अहंकार आणि गर्वामुळे ते आज पाठीमागे आहेत तर सुरेश नवले यांनी बीड विधानसभेमधून आमदार मीच होणार अशी भूमका उठविली मात्र त्यांनी या अगोदर एक सुरेश नवले मित्र मंडळाच्या माध्यमातून कार्यक्रमही केला शक्ती प्रदर्शनामध्ये वेगवेगळ्या पक्ष संघटनेच्या कार्यकर्त्यांना फोन करून माझ्या कार्यक्रमाला माणसं पाठवा असेही सांगितले की अनेक चर्चा बीड शहरांमध्ये काही दिवसापूर्वी ऐकायला मिळाली होती? मनोज जरांगे पाटील यांचे बॅनर लावून तुम्हाला आमदार होता येणार नाही त्यासाठी निष्ठावंत मराठा व्हावं लागेल कारण निष्ठावंत मराठ्याच सर्वसामान्यांच्या पोराला न्याय म्हणून मनोज दादा जरांगे पाटील यांनी उमेदवारी देऊन न्याय देतील अशी अपेक्षा १८ पगड जातीला आहे तर सुरेश नवले यांना जर उमेदवारी दिली तर त्या ठिकाणी त्याचा काय परिणाम होईल हे स्वतः मराठा बांधवांना सुद्धा माहिती आहे निष्ठावंत मराठा बांधव सर्वसामान्य आंदोलन असेल किंवा मोठे आंदोलन असेल त्या आंदोलनामध्ये जो कार्यरत सक्रिय चेहरा असेल मराठा समाजाला न्याय देण्यासाठी २४ तास रस्त्यावर उतरल एसी मध्ये बसून प्रश्न सुटत नसतात नवले साहेब तर त्याला रस्त्यावर उन्हामध्ये फिरावं लागतं चार दिवसांमध्ये बीड शहरांमध्ये बॅनर लावले म्हणजे मी बीडचा बीड विधानसभेचा आमदार झालो असं होणार नाही त्यामुळे सुरेश नवले यांच्या बाबतीमध्ये मराठा समाजात नव्हतं १८ पगड जातीतील लोकांना मतदान बंधू भगिनींना पडलेला प्रश्न हा आहे की सुरेश नवले यांच्या पाठीमागे बीड विधानसभेमध्ये किती बूथ प्रमुख आहेत किती सर्कल प्रमुख आहेत कोणत्या पक्षाचे पाठबळ आहे किंवा सुरेश नवले हे या अगोदर अनेकदा पक्षांमध्ये जाऊन पुन्हा बाहेर पडलेले आहेत तर सुरेश नवले हे फक्त गुत्तेदारीसाठी राजकारण करत आहेत असेही चर्चा बीड मतदारसंघांमध्ये ऐकायला मिळत आहे. त्यामुळे मराठा बांधवांच्या वतीने व १८ पगड जातीच्या वतीने मनोज दादा जरांगे पाटील यांना विनंती आहे की येणाऱ्या काळामध्ये निष्ठावंत समाजसेवकाला बीड विधानसभेची उमेदवारी द्यावी तसेच मनोज दादा जरांगे पाटील यांचे विचार हे आता जगामध्ये पोहोचलेले असताना त्या ठिकाणी मनोज दादा जरांगे पाटील सांगतील तोच उमेदवार आता बीडचा आमदार होण्याची शंभर टक्के खात्री जनतेला आहे आणि मनोज दादा जरांगे पाटील यांच्या पाठीशी अनेक समाजातील अठरापगड जातीतील लोक मतदार बंधू-भगिनी उभा खंबीरपणे उभा राहतील

# कोट्यावधी रुपयांच्या बिलाच्या टक्केवारी मध्ये बी एस ठाकूर छापू लागला मंदिर बांधण्याच्या पावतीवर पैसे?



- बीडच्या एमजीपी कार्यालयात लेखापाल असलेला ठाकूर देवाच्या नावावर नांदेड जिल्ह्यामधील पावतीच्या माध्यमातून छापू लागला पैसे
- बीडच्या एमजीपी कार्यालयातील लेखापाल ठाकूर स्वतःच्या सहीने नांदेड येथील देणगी पावतीवर करू लागला सह्या?
- बीडच्या एमजेपी कार्यालयातील लेखापाल बी एस ठाकूरला नांदेड येथील मंदिराची देणगी पावती बीडमध्ये पाडण्याची गरज काय?
- बीडच्या एमजेपी कार्यालयामध्ये येणारा गुत्तेदार असेल किंवा कर्मचारी याला राधाकृष्ण सभामंडपाची नांदेड येथील मंदिराच्या
- निधीसाठी पावती घेणे साठी ठाकूर कडून त्रास होऊ लागला?

  मनीषा ताई पलांडे आपण लक्ष देणे गरजेचे

**छत्रपती संभाजी नगर येथील कोणत्या अधिकाऱ्याच्या मर्जीतील हा उपलेखापाल असलेला बीएस ठाकूर याला लेखापालचा मुख्य चार्ज बीडचा दिलेला आहे बीड मधून टक्केवारी कमी होणारा आता देव देवतांच्या मंदिराच्या सभा मंडपाच्या नावावर सुद्धा पैसे खायला कमी पडत आहेत याकडे मनीषा पणाने मॅडम यांनी लक्ष देणे गरजेचे आहे तर यावेळी आता**

**मनीषा पलांडे मॅडम श्री बी एस ठाकुर उपलेखापाल यांना –इउऊयेत नाही आपण इंग्लिश मध्ये ठाकुरशी चर्चा करा श्री ठाकुरची बोबडी सुटतील हे पण तितकेच खरं, श्री बी एस ठाकुर उपलेखापाल कोणी केले कसे केले माहित नाही बंडल घेऊन पदोन्नती दिली गेली अशी चर्चा आहे. श्री ठाकुर उपलेखापाल असतांना विभागीय लेखापाल पदी पोस्टिंग देण्यासाठी ५ लाख चा रेट ठरविले गेलं.**




बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा एमजीपी कार्यालयात अकाउंटंट असलेला उपलेखापाल मूळ पदावर असताना मुख्य लेखापाल चा चार्ज घेऊन पट्ट्यावर रुपाची टक्केवारी काढत छत्रपती संभाजीनगर येथील अधिकाऱ्यांना खुश ठेवत अनेक योजनांमध्ये शकल लढवणारा अधिकारी म्हणून जर कोणाची ओळख असेल तर तो अधिकारी बीड जिल्हा एमजीपी कार्यालयातील बीएस ठाकूर हे आहेत आता बीएस ठाकूर यांनी नांदेड जिल्ह्यात सुद्धा देव देवतांचे मंदिर बांधकामासाठी बीड जिल्हा एमजीपी कार्यालयाच्या मृत्यदारांच्या माध्यमातून एक पावती बुक छापून त्यावरती स्वतःची सही करत स्वतःच्या अक्षराने त्या ठिकाणी मंदिर उभारत असलेल्या नांदेड येथील राधाकृष्ण मंदिर सभा मंडपाच्या बांधकामासाठी चा पावती बुकावर स्वतःची खिसे भरण्याचे काम केलेले आहे यामध्ये जवळपास दोन ते तीन लाख रुपये एमजीपी कार्यालयात येणार जाणाऱ्या गुत्तेदारांकडून अकाउंटंट ठाकूर यांनी गोळा केल्याची चर्चा पीएनजीपी कार्यालयात चालू आहे बीडच्या एमजेपी कार्यालयामध्ये नांदेड येथील हिप्परगा तालुका मुखेड जिल्हा नांदेड येथील एका राधाकृष्ण मंदिर सभागृहाच्या बांधकामासाठी ठाकूरला पैसे गोळा करण्यासाठी छत्रपती संभाजी नगर येथील मोठ्या अधिकाऱ्याची परवानगी घेऊन हे पावती फाडत आहे असेही दम यावेळी येणाऱ्या जाणाऱ्या गुत्तेदार व अन्य कर्मचाऱ्यांना देऊन ठाकूर स्वतःची खिसे भरत आहे त्यामुळे मनीषा पलांडे मॅडम यांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे तर अकाउंटंट असलेल्या बीएस ठाकूरची शैक्षणिक पात्रता पासून पुन्हा एकदा एमजीपी कार्यालयाकडून ही परीक्षा घेऊन ये येते झेड पर्यंतची चाचणी एकदा करूनच घ्या अकाउंटंट ला वाजता लिहिता येते का इंग्रजी भाषेचे ज्ञान आहे का याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे?

# बुद्धभुमी बचाव आंदोलनाच्या समर्थनार्थ अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावर लिंबागणेश येथे रास्तारोको आंदोलन:- डॉ.गणेश ढवळे

बीड।प्रतिनिधी

मराठवाड्यातील बौद्धांचे श्रद्धास्थळ म्हणून छत्रपती संभाजीनगर शहरातील बुद्ध लेखणीच्या पायथ्याशी असलेल्या विपश्यना विहार,मेडिटेशन सेंटरला अतिक्रमण समजुन नोटीस बजावण्यात आली असुन यामुळे बौद्ध समाजाच्या भावना जाणिवपूर्वक दुखावण्याचे षडयंत्र असुन याच्या निषेधार्थ आणि बीड येथील नियोजित रेल्वे स्टेशनला डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्टेशन नाव द्यावे यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे समितीच्या वतीने दि.०९ बुधवार रोजी आयोजित मोर्चाला पोलिस प्रशासनाने परवानगी नाकारली यांच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१०. वार गुरूवार रोजी सकाळी ११ वाजता अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान शिवतीर्थ लिंबागणेश येथे बुद्ध भुमी बचाव आंदोलन समर्थनार्थ रास्ता रोको आंदोलन करण्यात आले यावेळी आंदोलनात सेवा सोसायटी लिंबागणेश चेअरमन रविंद्र निर्मळ, शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, आल इंडिया पँथर सेनेचे बीड जिल्ह्यध्यक्ष नितीन सोनावणे, सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ गिरे, बाळकृष्ण थोरात, सुरेश निर्मळ,आरूण निर्मळ, जितेंद्र निर्मळ, शंकर निर्मळ, अमोल वक्ते, पप्पू निर्मळ, विक्रांत वाणी, अशोक जाधव आदी आंबेडकर अनुयायी सहभागी झाले होते.निवेदन नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे,लिंबागणेश पोलिस चौकीचे अंमलदार बाबासाहेब डोंगरे, नवनाथ मुंढे, संतोष राऊत , तलाठी गणपत पोतदार यांना देण्यात आले.




मराठवाड्यातील बौद्धांचे श्रद्धास्थळ म्हणून छत्रपती संभाजीनगर शहरातील बुद्ध लेखणीच्या पायथ्याशी असलेल्या विहार,मेडिटेशन सेंटरला गेल्या ६०- ७० वर्षांपासून दरवर्षी जवळपास १० लाख उपासक,उपासिका तसेच अभ्यासक,पर्यटक भेट देतात.मात्र या श्रद्धास्थळाला अतिक्रमण समजुन नोटीस बजावण्यात आली असुन यामुळे बौद्ध समाजात संतापाची लाट उसळली असून यामुळे बौद्ध समाजाच्या भावना जाणिवपूर्वक दुखावण्याचे षडयंत्र असुन मुळातच हजारो वर्षांपासून बौद्ध लेणी अस्तित्वात असताना त्यांच्या पायथ्याची जागा विद्यापीठाची कशी असेल असा प्रश्न उपस्थित होत असताना कोणतीही शहानिशा न करता बौद्धांच्या ऐतिहासिक स्थळाला हटविण्याचा मनुवादी सरकारचा डाव असुन हाणुन पाडण्यासाठी बौद्ध लेणी बचाव,बुद्धभुमी बचाव म्हणत अस्मितेचा लढा लढण्यासाठी आणि शासनाच्या निषेधार्थ संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी.

बुद्ध लेणीच्या पायथ्याशी पायाभूत सुविधांसाठी ५० एक्कर जागा द्यावी. बुद्धिष्ट सर्किट मध्ये या वास्तुचा समावेश करावा, पर्यटन स्थळ व तिर्थक्षेत्राच्या यादीत समावेश करावा, अजिंठा लेणीच्या धर्तीवर प्रकाशयोजना करावी,लेणीच्या डोंगराच्या संवर्धनासाठी विशेष निधीची तरतूद करावी,अजिंठा लेणी मार्गावरील हर्सुल टी पाँइंट येथे भव्य बुद्ध मूर्ती बसविण्यात यावी.आजिंठा लेणी मार्गाचे रखडलेले काम युद्धपातळीवर पुर्ण करावे.

बीड येथील नियोजित रेल्वे स्टेशनला डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्टेशन नाव द्यावे यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे समिती व आंबेडकरी जनतेकडून काल दि.०९.१०.२०२४ वार बुधवार रोजी मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.त्यासाठी जिल्ह्यातील विविध भागातील समाज बांधव बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ दाखल झाले होते.यावेळी पोलिसांनी मोर्चा काढण्यास राज्यपालांच्या दौऱ्याचे कारण पुढे करत परवानगी नाकारली. राज्यपालांचा दौरा केवळ २ तास होता त्यामुळे पोलिस प्रशासनाने काही मार्ग काढण्यासाठी प्रयत्न केले नाहीत याबद्दल आंबेडकर अनुयायांनी नाराजी व्यक्त केली याचा डॉ . गणेश ढवळे यांनी तिव्र निषेध व्यक्त केला.



## पत्रकार किरण जावळे यांचा वाढदिवस झाडे लावून साजरा

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील नांदा येथील पत्रकार किरण जावळे यांचा वाढदिवस जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नांदा येथे,व्यर्थ खर्च टाळून,शाळेच्या परिसरात झाडे लावून साजरा करण्यात आला. यावेळी आंबा,लिम्बोनी, कढीपत्ता,फणस,असे झाडे लावन्यात आले यावेळी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रवि काका ढोबळे यांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली.

यावेळी पत्रकार किरण जावळे सर यांनी सांगितले

संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या पूर्ण होत नाही व मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही.तोपर्यंत मी माझा वाढदिवस छोट्या पद्धतीने साजरा करणार आहे असे बोलताना रवि काका ढोबळे यांनी नांदा येते सांगण्यात आले यावेळी उपस्थित भारतीय राष्ट्रीय काँग्रेस तालुकाध्यक्ष रवि काका ढोबळे,चोभा निमगावचे माजी सरपंच बबनराव पवार, प्रगतशील शेतकरी दत्तात्रय ढोबळे पाटील,माजी सरपंच पंडितराव आवटे,माजी सरपंच राधाकृष्ण आवटे,नांदा गावचे उपसरपंच बजरंग आवटे,ग्रामपंचायतचे सदस्य विष्णू आवटे, शालेय समितीचे अध्यक्ष सुशांत ढोबळे पाटील, दादासाहेब आवटे पुढारी,गणेश गुंजाळ,छगन कर्डिले,आदिनाथ रामराव आवटे,बन्सी आवटे, अतुल आवटे,सरोदे सर,शिंदे सर आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## कारी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी अंकिता मिलिंद मुजमुले तर उपाध्यक्षपदी दिगंबर वावळकर बिनविरोध यांची निवड

धारुर ।प्रतिनिधी

**धारूर तालुक्यातील कारी गावामध्ये शालेय व्यवस्थापन समितीची नुकतीच निवडणुक पार पडली या निवडणुकीत शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी अंकिता मिलिंद मुजमुले तर दिगंबर वावळकर यांची बिनविरोध निवड झाली सदस्य म्हणून भगवान मोरे, आणि विकास वावळकर, अरुणा महेंद्र मुजमुले, राम मुजमुले तालेब भाई शेख यांची निवड झाली या बैठकीत कारी गावचे विद्यमान सरपंच दीपक भैय्या मोरे. माजी उपसरपंच लक्ष्मण मोरे अर्जुन वावळकर बंडू पाटील मोरे यांनी मोलाची सहकार्य केले**

आणि कारी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री अर्जुन मुंडेसर आणि सर्व शिक्षक वृंद या बैठकीला उपस्थित होते..



## गेवराई विधानसभेची जागा महाविकास आघाडीकडून शरद पवार पक्षाला सुटण्याची शक्यता - अण्णासाहेब राठोड

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंततर पुर्वीपासून पक्षाचा मजबुत गड असलेल्या बीड जिल्ह्यावर शरद पवारांनी विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीला पहिला दणका दिल्यानंतर आता विधानसभेत दुसरा डाव टाकण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार मैदानात उतरले आहेत. अजित पवारांच्या बंडाला साथ देणारे जिल्ह्यातील नेत्यांचा करेक्ट कार्यक्रम करण्यासाठी उमेदवारांचा शोध सुरू आहे. तसेच गेवराई विधानसभेसाठी महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार यांच्या गटाला सुटण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे



गेवराई तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांनी नुकतेच प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची भेट घेऊन महाविकास आघाडीकडून गेवराई विधानसभेसाठी जागा सोडविण्यासाठी विनंती केली आहे. पक्ष फुटी नंतर अवघ्या १२ ते १३ महिन्यांमध्ये प्रत्येक सर्कलमध्ये पक्ष संघटना मजबूत करून संपूर्ण तालुक्यामध्ये पक्षाचे जाळे निर्माण केल्यामुळे लोकसभा निवडणुकीमध्ये गेवराई विधानसभा मतदारसंघातून ३९ हजाराचे प्रचंड मताधिक्य मिळाले होते. त्यामुळे या विधानसभा मतदारसंघातून पक्षाचा उमेदवार निश्चित निवडून येऊ शकतो. असा विश्वास तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांनी व्यक्त केला. तसेच पक्ष संकटामध्ये असताना आपण पक्षाच्या तालुकाध्यक्ष धुरा संभाळल्यानंतर गेवराई तालुक्यातील तळागाळात वाडी वस्ती तांड्यावरती पोहोचवला तसेच पक्षाचे भूत संघटना मजबूत करून तरुण शेतकरी महिला बेरोजगार सर्वसामान्य जनता यांना एकत्र करून पक्षाच्या प्रवाहामध्ये आणले त्यामुळे या मतदारसंघातून पक्षाचा उमेदवार निश्चित विजय होईल. बाहेर जाऊ कुठलाही उमेदवार आहेत न करता निष्ठावंत व सर्व सामान्यांना उमेदवारी द्यावी असे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांनी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना सांगितले. व त्यांनी महाविकास आघाडीचे जागावाटपाची चर्चा झाल्यानंतर निश्चित गेवराई विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादीकडे वळवण्यासाठी प्रयत्न केले जातील. महाविकास आघाडीतील सर्व नेत्यांना विश्वासात घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे ही जागा घेतली जाईल असे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आश्वासन दिले. तसेच सगळ्या गोष्टीचा विचार करून आपण चर्चा करून त्यातून निश्चित मार्ग काढू असे आश्वासित केले आहे.

# राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पार्टी बीड जिल्ह्यात मुस्लिम समाजातील उमेदवारी देऊन न्याय देणार का ?

### माजलगाव मतदारसंघातून मा.नगराध्यक्ष शेख मंजुर यांची उमेदवारीची मागणी

माजलगाव ।प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा शरदचंद्रजी पवार साहेब हे बीड जिल्ह्यातून विधानसभेसाठी मुस्लिम समाजाचा एक तरी उमेदवार देऊन मुस्लिम समाजाला न्याय द्यावा अशी मागणी समाजातून केली जात आहे. राष्ट्रवादी शरद चंद्र पवार पार्टी कडून बीड जिल्ह्यातील एक विधानसभा मतदारसंघ मुस्लिम उमेदवार साठी सोडतील का? त्यापैकी जिल्ह्यातील माजलगाव मतदार संघातून माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पार्टीकडे उमेदवारी मागितल्याचे कळते. पवार साहेब मुस्लिम समाजातील निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय देतील का? गेल्या लोकसभेला बजरंग बप्पा सोनवणे यांना विजयी करण्यामध्ये बीड जिल्ह्यातील मुस्लिम समाजाचा सिंहाचा वाटा आहे बीड व माजलगाव या मतदारसंघांमध्ये मुस्लिम समाजाची मतदानाची टक्केवारी जर पाहिली तर बीड नंतर माजलगाव मतदार संघामध्ये मुस्लिमांची मतदार संख्या ५० ते ५५ हजार



आहे राष्ट्रवादी पार्टी कडून माजलगाव मतदार संघामध्ये शेख मंजूर यांनी उमेदवारी मागितली आहे. जर मतदारांच्या गणिताची जुळवा-

### मुस्लिम समाजाला उमेदवारी वाटा द्या

लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मुस्लिम समाज बांधवांनी एकजुटीने भाजपाच्या विरोधामध्ये मतदान करून एक ऐतिहासिक निर्णय घेतलेला आहे परंतु होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये बीड जिल्ह्यात मुस्लिम समाजाला प्रतिनिधित्व देऊन न्याय द्यावा अन्यथा लोकसभेप्रमाणे या पक्षाला लोक मतदान करतीलच अशी परिस्थिती जिल्ह्यात नाही अशी चर्चा मुस्लिम समाज बांधवांमध्ये होताना दिसत आहे

जुळव केल्यास जिल्ह्यातील विजयी उमेदवारांमध्ये माजलगावच्या विजयी उमेदवाराची भर निश्चित पडल्याशिवाय राहणार नाही. अशीच स्थिती निर्माण झाली आहे. बीड लोकसभा मतदार मतदार संघातून बजरंग बप्पा सोनवणे हे थोड्या बहुत लीडने निवडून आले हे जरी खरे असले तरी जिल्ह्यातील विरोधी पक्षाला माहित आहे की मुस्लिम समाजाने मोदी विरोधात व शरद चंद्र पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून एकजुटिने मतदान केले होते.त्यामध्ये माजलगाव मतदार संघातून हि बहुसंख्याक मुस्लिम समाजाच्या बुथवरिल टक्केवारी पाहिली तर ९० ते ९५ टक्के मतदान हे बजरंग बाप्पाला झाले आहे. त्यामुळे मुस्लिम समाजाने आपल्या समाजातील व्यक्तीला विधानसभेची उमेदवारी मिळावी ही आग्रही भूमिका समाजातील शिष्टमंडळाने पक्ष नेतृत्वाकडे केली आहे म्हणूनच माजलगाव मतदार संघातून मुस्लिम समाजापैकी शेख मंजूर यांनी समाजाच्या पाठिंब्यावर व नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळात केलेल्या विकास कामांवर पक्षाकडे आपल्या उमेदवारीची मागणी केली आहे. जिल्ह्यातील मुस्लिम समाजाच्या नजरा आता पक्षाच्या निर्णयाकडे लागलेल्या आहेत.

## स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीचे दर्शन घेऊन प्रा.ईश्वर मुंडे यांनी दिली पक्षाकडे मुलाखत

किल्ले धारूर / प्रतिनिधि

सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात खा.शरदचंद्र पवार हे बीग बॉस च्या भूमिकेत दिसत आहेत. राष्ट्रवादी कॅांग्रेस शरदचंद्र पक्षात अनेकांचे इन कमिंग होत आहेत कांही जन रांगेत उभे आहेत. राष्ट्रवादी कॅांग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडे ज्या ईच्छूक उमेदवारांनी अधिकृत पक्षाचे सदस्यत्व फीस व नाममात्र पक्ष निधी जमा केलेला आहे अशा इच्छूक उमेदवीरांच्या मुलाखती मार्केट यार्ड पुणे येथील निसर्ग कार्यालयात दि.५ क्टोबर २०२४ शनिवारी घेण्यात आल्या. या मुलाखतीसाठी दस्तूर खुद खा.शरदचंद्र पवार,खा.फौजिया खान,खा.वंदना चव्हाण,आ.राजेश टोपे,खा.बजरंग बप्पा सोनवणे,आ.रोहीत पवार,महेबुब शेख,राज राजापूरकर,हिरालाल राठोड,डॉ.नरेंद्र काळे यांचे सह पार्लमेंट्री बोर्ड चे सदस्य उपस्थीत होते. सर्वच इच्छूक उमेदवार पक्षाकडे मुलाखती देत आसतात परंतू प्रा. ईश्वर मुंडे यांची मुलाखत ही वैशिष्टय पूर्ण झाली. याचे कारण म्हणजे हिमालयाच्या मदतीला धावलेले सह्याद्री,पुरोगामी विचारांचा वसा व वारसा चालवणारे,खा.शरदचंद्र पवार यांचे श्रध्दास्थान,महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या प्रिती



संगम (कृष्णा - कोयना) कराड जि. सातारा येथील समाधीचे दर्शन घेऊन,आशिर्वाद घेऊन मुलाखत दिली.आपली पक्ष निष्ठा व खा.शरदचंद्र पवार यांच्या सोशल इंजिनिअरींच्या राजकीय खेळीमुळे आपल्यालाच उमेदवारी मिळेल या आत्मविश्वासाने प्रा.ईश्वर मुंडे यांनी मतदार संघात जन संपर्क वाढवला आहे. उच्च शिक्षीत,स्वच्छ प्रतिमा व सर्व समावेशक चेहरा या मुळे प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांना माजलगाव मतदार संघातील मतदारांकडून पसंती मिळत आहे.

## ॲड. शेख शफिक भाऊंनी विविध विषयांवर राज्यपालांना दिले निवेदन; साधला संवाद

बीड ।प्रतिनिधी

एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांना विविध विषयांवर निवेदन देऊन त्यांच्या सोबत संवाद साधला. महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन हे बीड दौऱ्यावर आले असता एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ यांनी त्यांची शासकीय विश्रामगृहावर भेट घेऊन विविध विषयांवर निवेदन देत संवाद साधला. यावेळी दिलेल्या निवेदनात शफिक भाऊंनी सर्व जाती-धर्मातील देवी, देवता, धार्मिक पुस्तके यांच्याबद्दल बोलणाऱ्यांविरूध्द कडक कायदा करावा. विशेष करुन मुस्लिम धर्मातील अल्लाह व मुहम्मद पैगंबरांबद्दल काही बाही बोलणाऱ्यांवर कडक कारवाई करावी व अजामीनपात्र असा कायदा अंमलात आणावा. वन नेशनल वन इलेक्शन या प्रस्तावाचा विरोध करावा. बीड जिल्हा रुग्णालयासाठी एम.आर.आय. मशीन उपलब्ध करून द्यावी. वृक्ष तोडणीसाठी आणलेल्या नवीन कायदे अतंर्गत १००० हजार रुपये ऐवजी ५०००० रुपये दंडाचा घेण्यात आलेला निर्णय रद्द करण्यात यावा. ही मागणी बीड जिल्हा सॉ मील असोसिएशन आणि शेतकऱ्यांच्या वतीने केली. मुस्लिम आरक्षण व संरक्षण कायदा अमलात आणावा. अशा मागण्या ड. शेख शफिक भाऊ यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांना दिलेल्या निवेदनातून केल्या आहेत.



राज्यपाल बीडला आल्यानंतर त्यांची भेट घेण्यासाठी शफिक भाऊ गेले. भेट घेऊन दिलेले निवेदन हे लक्षात घेण्यासारखे आहे. भाऊ मुस्लिम असूनही त्यांनी फक्त इस्लाम किंवा पैगंबर यांच्याबद्दल अवमान करणाऱ्यांचाच नाही तर सर्व जाती धर्मातील देवी, देवता, धार्मिक पुस्तके यांच्या बद्दल मनाला येईल ते बरडणार्या किंवा अवमान करणाऱ्यांविरुद्ध कडक कायदा करण्याची मागणी केली. राजकीय क्षेत्रात आणि देशात खळबळ उडविणाऱ्या वन नेशन वन इलेक्शनच्या प्रस्तावाला विरोध केला. सर्वसामान्यांसाठी कळीचा मुद्दा असलेली एम.आर.आय. मशीन जिल्हा रुग्णालयात उपलब्ध करून देण्याची मागणी केली. सॉ मिल चालक आणि शेतकऱ्यांसाठी सुद्धा मागणी केली. या सर्व बाबी पाहता शफिक भाऊ यांची सर्व समावेशकता नजरेत भरते. यामुळे शफिक भाऊ यांचे नेतृत्व सर्व जाती धर्म आणि समाजासाठी असल्याचे पुन्हा एकदा दिसून आले.

# बीड विधानसभा मतदारसंघात अडीच हजार घरकुलांना मंजुरी

### डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मानले पालकमंत्री ना.धनंजय मुंडेंचे आभार

बीड ।प्रतिनिधी

राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून बीड विधानसभा मतदारसंघातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील नागरिकांसाठी तब्बल अडीच हजार घरकुलांना राज्य शासनाने बुधवारी (दि.९) मंजुरी दिली. पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या आग्रही मागणीमुळे विभागाचे मंत्री ना.अतुल सावे यांनी हा निर्णय घेतला. त्याबद्दल दोघांचेही राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आभार मानले आहेत.

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून बीड जिल्ह्यात तब्बल २८ हजार घरकुलांना मंजुरी मिळाली आहे.



त्यामध्ये बीड विधानसभा मतदारसंघातील बीड तालुक्यातून १५०० तर शिरूर कासार तालुक्यातून १००० हून अधिक अशा एकूण २ हजार ५०० घरकुलांचा समावेश आहे. या सर्व लाभार्थ्यांना योजनेतून स्वतःचे पक्के घर बांधण्यासाठी प्रत्येकी १ लाख २० हजार रुपये निधी मिळणार आहे. यापूर्वी पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, मतदारसंघातील अनेक सरपंचांनी हजारो घरकुलाचे प्रस्ताव पंचायत समितीमार्फत दाखल केले होते. त्यातून जिल्हास्तरीय समितीने पात्र प्रस्ताव शासनाकडे पाठविले. परंतु अनेक महिन्यांपासून मंजुरीसाठी प्रलंबित असल्याने सरपंचांकडून सातत्याने मंजुरीची मागणी होत होती. या मागणीची दखल घेऊन पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री ना.अतुल सावे यांनी रेकॉर्डब्रेक २८ हजार घरकुलांना मंजुरी दिली. यात बीड विधानसभा मतदारसंघातील तब्बल अडीच हजार घरकुलांचा प्रश्न मार्गी लागल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

### पालकमंत्र्यांना भेटून सरपंच आभार मानणार

बीड विधानसभा मतदारसंघातील अनेक गावातून घरकुलांचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित होते. परंतु अनेक हेलपाटे मारून मंजुरी मिळत नव्हती. अखेर पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी घरकुलांचा प्रश्न मार्गी लावला असून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली अनेक सरपंच हे ना.मुंडे यांची भेट घेऊन आभार मानणार असल्याचे सांगितले आहे.

# जन हक्कांच्या सुविधासाठी आष्टी तहसील कार्यालयावर १४ ऑक्टोबरला गांधीगिरी आंदोलन

आष्टी ।प्रतिनिधी

तालुक्यातील तहसिलदार तथा न्यायदंडाधिकारी कार्यालय आष्टी यांच्या कार्यालयात आम्हां भारतीय नागरिकांना मानवी हक्काच्या सुविधा भेटत नसल्याकारणाने १४ ऑक्टोंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता आष्टी तालुक्यातील संविधान प्रेमी नागरिक करणारं गांधीगिरी आंदोलन .

सविस्तर माहिती अशी की, आष्टी तहसील कार्यालयात सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या हक्काच्या सुविधा भेटत नाहीत. प्राथमिक सुविधा सुद्धा भेटत नाहीत . तहसीदार कार्यालय व परिसरात पिण्याचे पाणी स्वच्छ व मुबलक नाही. महिलांसाठी स्वतंत्र सार्वजनिक व पुरुषांसाठी स्वतंत्र मुतारी संडासची सोय नाही. म्हणून कार्यालयाच्या कंपाउंड भोवती महिला पुरुषांना नैसर्गिक विधी करावा लागत आहे .कार्यालयात व परिसरात घाणीचे साम्राज्य आहे. गवत झाडे मोठमोठे झाले आहेत. कर्मचाऱ्यांच्या मावा खाऊन थुकीनें कित्येक परिसरात सडांपडलां आहे . कार्यालयातून देण्यात येणारे कागदपत्र, खसरा पत्रक, कुपन, शपथपत्र, संजय संजय गांधी, श्रावणबाळ योजना,फेरफिर व अन्य कागदपत्रं साठी कित्येक पैशाची अनाधिकृत नागरिकांची लुट सरास केली जात आहे. कुठेही नियमावलीचा बोर्ड नाही. किंवा वसूल केलेल्या रक्कम ची पावती भेटत नाही. नागरीकांच्या हक्काच्या सुविधाची कोणतीही माहिती कर्मचारी स्वतःहून जाहीर प्रकटन करीत नाही. तहसिल मध्ये राजकीय पक्षा पार्ट्यांच्या लोकांचा हस्तक्षेप जास्त दिसून येतो.

व कर्मचारी त्यांनाच प्राधान्य देतात. सर्वसामान्यांना मात्र ते कर्मचारी उद्धटपणाची वागणूक देत आहेत. हे सर्व १४ ऑक्टोबरच्या आतं थांबले नाहीत गांधीगिरी पद्धतीने आष्टी तहसील वर आंदोलन करण्याचा इशारा दिलेल्या निवेदनात समाजसेवक श्री. परमेश्वर रामचंद्र घोडके श्री.स्वप्निल शिवाजी पोटे युवा नेते शौकत पठाण धुळाजी लकडे अशोक माने कैलास दरेकर प्रा. राम बोडखे शेख अजमुद्दिन यासह आष्टी तालुक्यातील संविधान प्रेमी ग्रुपमेंबर यांनी गांधीगिरी आंदोलनाचा इशारा दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात देण्यात आला आहे.

# आम आदमी पार्टी ला काँग्रेसने सोबत घेतलं असतं तर काँग्रेसचे पाच हजाराच्या फरकाने २८ आमदार पडले नसते-आप संघटनमंत्री प्रदिप थोरवे

## आम दमी पार्टी ला महाराष्ट्रात काही जागा देऊन एकत्र लढावं, अन्यथा पराभवाचा हरियाणा पॅटर्न वाट्याला येईल-आप संघटनमंत्री प्रदिप थोरवे

आष्टी (प्रतिनिधी)

हरियाणात आम आदमी पार्टी वेगळी लढल्याने पराभव झाला ! २८ उमेदवार ५००० च्या फरकाने पडले!इंडिया आघाडी तुटल्याचा परिणाम हरियाणा मध्ये दिसत आहे.आम आदमी पार्टी ला काँग्रेसने सोबत घेतलं असतं तर काँग्रेसचे पाच हजाराच्या फरकाने २८ आमदार पडले नसते.

गेल्या लोकसभेला देशातील आम अदामी पार्टी च्या कार्यकर्त्यांनी इंडिया आघाडीच्या उमेदवारांचा प्रचार केला होता. त्यावेळी महाराष्ट्रात आप च्या कार्यकर्त्यांच कौतुक शरद पवार, सुप्रिया सुळे, उद्धव ठाकरे यानी केलं होत. परंतु फक्त कौतुक करून चालणार नाही तर,राज्यात महाविकास आघाडीने या निकालातून गंभीर्याने बोध घ्यावा,आणि आम दमी पार्टी ला महाराष्ट्रात काही जागा देऊन एकत्र लढावं आणखी नव्याना सोबत घ्यावं पण वेगळं लढू नये.महाराष्ट्रात इंडिया आघाडी टिकवावी, अन्यथा पराभवाचा हरियाणा पॅटर्न वाट्याला येईल. असे प्रतिपादन आम आदमी पार्टी चे महाराष्ट्रचे संघटन मंत्री प्रदिप थोरवे यांनी केलं आहे.

# नवरात्र उत्सव निमित्ताने रेणुका देवी माता मंदिर येथे आठवडी बाजार व जत्रा बहरली आहे

शिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळा परिसरातील प्रसिद्ध असलेले रेणुका माता मंदिर शिरसाळा येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी एक सहावी माळ म्हणून गुरुवारच्या आठवडी बाजार या ठिकाणी रेणुका माता मंदिराच्या परिसरामध्ये भरण्यात आला आहे तरी येथील महिलांची रात्री व सकाळी दर्शनासाठी येण्या-जाण्याची गर्दी असते पुजारी व ब्राह्मण वर्गामध्ये या देवीचे जास्त महत्व आहे रेणुका माता देवीचे यात्रा म्हणून उत्सव या ठिकाणी साजरा केला जातो दरवर्षीप्रमाणे केली जातो यामध्ये लहान मुलाचे खेळणे असते बरेच गोष्टी या आठवणी बाजाराच्या व देवीच्या परिसरामध्ये जत्रा भरलेले असते देवीच्या भक्ताने माळा घेऊन दर्शनाला झाल्या लांब रांगा लागल्या असतात दर्शन घेण्यासाठी येत असते ग्रामपंचायत व शिरसाळा पोलीस स्टेशनच्या वतीने रेणुका माता मंदिर परिसरातील पूर्ण व्यवस्था स्वच्छता व सुई सुविधा सर्व गाय ग्रामपंचायतच्या वतीने केल्या जाते व जत्रा मधील काही प्रकार घडू नये म्हणून सिरसाळा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक श्री दहिफळे साहेब पीएसआय श्री जाधव साहेब शिरसाळा बीट अंमलदार हनुमंत मुंडे साहेब शेंगोळे साहेब जेठेवाड साहेब आणि होमगार्ड यांचा



बंदोबस्त साठी देवीच्या पूर्ण परिसरात भक्तांना इतरांना कुणालाही त्रास होऊ नये यासाठी पोलीस प्रशासन काम करत आहे ग्रामपंचायत कार्यालय सदैव व यामध्ये रघुनाथ देशमुख संतोष पांडे पप्पू पांडे वैजनाथ देशमुख हेमंत लोंढे बाळू टेकाळे यांचं या जत्रा परिसरावर लक्ष असते तात्पर आहे तरी भाविकांचे गावकऱ्यांच्या वतीने हार्दिक स्वागत करण्यात येत आहे

# सागर इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज सिरसदेवी येथे एकदिवसीय रास दांडिया महोत्सव साजरा

सिरसदेवी ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येतील सागर इंग्लिश स्कुल येथे दिनांक ९ ऑक्टोबर रोजी नवरात्र महोत्सवानिमित्त दांडिया नाईट चे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमांमध्ये विध्यार्थ्यांच्या माता पालकांचा प्रचंड प्रतिसाद दिसून आला भक्ती आणि शक्तीचा हा सुंदर असा संगम येथे दिसून आला विध्यार्थ्यांचा माता पालकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते त्यासाठी आकर्षक बक्षीसही देण्यात आली हा कार्यक्रम मोठया उत्सहात सपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून खोलेश्वर विद्यालय दिंद्रुडचे अध्यक्ष मा.श्री.पारेकर सर उपस्थित होते आपली संस्कृती आणि पारंपारिकता जपत हा कार्यक्रम सागर इंग्लिश स्कूल तर्फे हा कार्यक्रम यशस्वीपणे घेण्यात आला यासाठी सागर इंग्लिश स्कूल आणि जूनियर कॉलेज चे अध्यक्ष माननीय श्री श्रीमंतजी सानप सर सागर इंग्लिश स्कूल आणि जुनियर कॉलेज चे सचिव माननीय श्री.संतोषजी पटाईत सर तसेच शाळेच्या प्राचार्या श्रीमती प्रीती सवयी यांनी मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख मिस आणि ज्योती भारती मिस यांनी केले होण्यासाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.



# अर्धमसला, मुधापुरी, खांडवी, रानमळ्यातील असंख्य कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

## बदामराव पंडितांकडून जंगी स्वागत

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील अर्धमसला मुधापुरी खांडवी आणि रानमळा येथील शिवाजीराव राऊत बाबासाहेब गिरे यांच्यासह असंख्य राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जाहीर प्रवेश केला असून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी त्यांचे भगवे रुमाल गळ्यात घालून जंगी स्वागत केले आहे.

अर्धमसला येथे दिनांक ७ ऑक्टोबर २०२४ रोजी शिवसेनेचे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली अर्धमसला, मुधापुरी, खांडवी आणि रानमळा येथील येथील शिवाजीराव राऊत, बाबासाहेब गिरे यांच्यासह सय्यद रियासद भाई, कमलाकर भिंगारे, लहू कादे, महादेव परदेशी, मिठू राऊत, महारुद्र मिसाळ, योगेश थोपटे, रवी राऊत, किसन सागडे, सागर पवळे, विकास उघडे, धोंडीराम पवळे, सोमीनाथ पिंपळे, पिंटू पवळे, अनिल भिंगारे, गणेश नरवडे, अनिल भोले, सतीश नरवडे, बाळू कानडे, सर्जेराव हटोटे, गणेश गिरे, उपेंद्र गिरे, अण्णा पवार, कल्याण धोत्रे, सुरेश पवार, श्रीमंत भोले, बाळू भोले, प्रभाकर शेजुळ, शेषराव भोले, राजेभाऊ जाधव, संतोष चव्हाण, महारुद्र सागडे, चंद्रकांत मुळक या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या असंख्य कार्यकर्त्यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित व विजयसिंह पंडित यांना सोडचिट्टी देऊन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. सर्वांचे गळ्यात भगवे रुमाल घालून बदामराव पंडित यांनी स्वागत केले. याप्रसंगी जिल्हा परिषद चे माजी अर्थ आणि बांधकाम सभापती युधाजित पंडित, शिवसेना उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, शिवसेना



तालुकाप्रमुख अजय दाभाडे, माजी उपनगराध्यक्ष अमोल करांडे, युवा सेना उपजिल्हाप्रमुख शेख सिराज, शेख नूरभाई, फैजल चाऊस, विश्वनाथ बोडखे, गंगाधर निकम, संतोष हिंगे, बंडू नांद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना बदामराव पंडित म्हणाले की, गेल्या ३० वर्षापासून मी तालुक्यातील गोरगरीब जनतेची प्रामाणिकपणे सेवा केली आहे. आजपर्यंत मी प्रत्येकाचे काही ना काही काम केलेले आहे. ज्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांसह सामान्य जनतेचे नुकसान केले ते माझ्यासोबत एका पक्षात आल्याने मायबाप जनतेने माझी चूक नसतानाही मला पराभूत केले. आज त्यांच्याच विरोधात आपण लढणार असल्याने, आता जनता त्यांना जागा दाखवील अशी मला अपेक्षा आहे. गेल्या दहा वर्षापासून सामान्यांच्या सुखदुःखात सहभागी होणार दुसरा नेता नसल्याने जनता हैराण झालेली आहे. त्यामुळे प्रत्येक गावातील राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपचे असंख्य कार्यकर्ते दररोज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश करत आहेत. महागाई, बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. त्यातच सरकार कडून शेतकरी, कष्टकरी आणि गोरगरिबांची फसवणूक झाल्याने जनतेने महायुतीला सत्तेतून बाहेर काढण्याचा निर्णय घेतला आहे. येणारा काळ आपलाच असून गेवराई विधानसभा मतदारसंघावर पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचाच भगवा फडकेल असा विश्वासही बदामराव पंडित यांनी व्यक्त करून, शिवसेनेमध्ये प्रवेश केलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याचा माझ्या जुन्या आणि एकनिष्ठ कार्यकर्त्यांप्रमाणेच मानसन्मान राखला जाईल अशीही ग्वाही दिली. शेख नूर भाई, अजय दाभाडे, शेख सिराज यांची समायोजित भाषणे झाली. याप्रसंगी गोरख हिंगे, रमेश राऊत, वसंत निकम, अभिषेक शिंदे, रसिदाली शेख, सिकंदर शेख, अफसर शेख, कालु भाई, वसंत तेलुरे, बाबा पटेल, शेख फिरोज, शेख हुजूर, मारुती गायकवाड, मौलाना शेख नजीर, रामजी थोपटे, प्रसाद पिंपळे, प्रसाद नांद्रे, त्रिंबक थोपटे, अमोल राऊत, विनोद भिंगारे, बंडू काष्टे, मारुती कादे, भागवत पिंपळे, नाना निकम, उत्तम भोले, अनिल भोले, मारुती थोरात, बाबासाहेब हिंगे, सिद्धेश्वर हिंगे, संजय हिंगे, गोरख हिंगे, सोनाजी वाघ, प्रवीण निकम, राजेंद्र जाधव आदींसह शिवसैनिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भगवान भक्ती गडावरील दसरा मेळाव्याची तयारी पूर्ण

बीड ।प्रतिनिधी

गुढी उभारून सावरगाव घाट मध्ये आमदार पंकजाताई मुंडे यांचे करणार स्वागत : बीडः भगवान भक्ती गड, सावरगाव घाट येथे आमदार पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत होणाऱ्या भव्य दसरा मेळाव्याची तयारी पूर्ण झाली असून आमदार पंकजाताई मुंडे यांचे सावरगाव घाट गावकरी गावांमध्ये गुढ्या उभारून भव्य मिरवणूकीने स्वागत करणार आहेत. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांनी समाजातील वंचित, शोषित, दुर्लक्षित बहुजनांच्या व्यथांना मांडणार विचारपीठ दसरा मेळाव्याच्या माध्यमातून उभारले होते.

साहेबांनी स्थापित केलेल्या या विचारपीठावर बहुजनांच्या प्रश्नांवर आवाज उठवणारे अनेक व्यक्ती आजपर्यंत आले आहेत, साहेबांपश्चात हे विचारपीठ लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांनी यथोचित चालवले आहे, आपलेही स्वागतच आहे कारण हा




दसरा राज्यातील त्या घटकाचा ज्यांचा कोणी वाली आणि वाणी नाही.. इथे कोणालाही निमंत्रण नसते सर्वजण आपोआप येतात. येथे सर्वांचेच स्वागत केले जाते.. भगवान भक्ती गडावर होणाऱ्या दसरा मेळाव्याच्या तयारीच्या माहितीसाठी संयोजन समितीचे सर्व स्वयंसेवक कार्यकर्ते यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये दसरा मेळाव्याची तयारी पूर्ण झाल्याची माहिती दिली. सर्जेराव तांदळे पि. टी. चव्हाण, माधवराव निर्मळ, अण्णासाहेब मतकर, राजाभाऊ अण्णा मुंडे, नवनाथ आण्णा शिराळे, विक्रांत हजारी, देविदास नागरगोजे, अशोक लोढाजी, सलीम जहांगीर, चंद्रकांत फड, संगीताताई धसे, डॉ. लक्ष्मण जाधव, इरशाद शेख, कल्याण आबुजजी, किरण आबा बांगर, दीपक मुंडे, शांतीनाथ डोरले, अनिल चांदणे, विलास बामणे, ओमप्रकाश गिरी दादासाहेब नंनवरे, यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या पत्रकार परिषदेत भगवान भक्ती गडावर होणाऱ्या मेळाव्याच्या तयारीची माहिती देण्यात आली.

संतश्रेष्ठ भगवान बाबा यांचे जन्मगाव असणाऱ्या सावरगाव घाट येथे आमदार पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये महाराष्ट्रातील अठरापगड जातीचा जनसमुदाय एकत्रित येऊन विचाराचे सोने लुटण्याचे काम गेली अनेक वर्षांपासून करतात

# मुस्लिम संरक्षण,धर्मावर डिबेट,सोशल मीडिया,कायदेसाठी खुर्शीद आलमचे राज्यपाल मार्फत राष्ट्रपतींना निवेदन दिले

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे राज्यपाल श्री.सि.पी.राधाकृष्णन आज बीडच्या दौऱ्यावर आले होते या निमित्ताने बीड नगरपरिषदेचे परिषदेचे माजी सभापती तथा शरदपवार राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड शहर अध्यक्ष खुर्शीद आलम यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल सन्माननीय श्री.सि.पी. राधाकृष्णन साहेब यांच्या मार्फत भारताचे राष्ट्रपती सन्माननीय श्री. रामनाथ गोविंद साहेब यांना निवेदन दिले आहे, निवेदनात म्हंटले आहे की आपल्या महाराष्ट्रासह भारत देशात दर रोज कोठे ना कोठे जातिय तेढ निर्माण होऊन दंगे परिस्थिती होतांना दिसत आहेत, याचे मुख्य कारण म्हणजे टीव्ही चॅनल वरील दर रोज जाती-धर्मावर होणाऱ्या डिबेट आहेत म्हणून टि.व्हि.वरील जाति धर्मावर होणाऱ्या डिबेट वर बंदी घालण्यात यावे, तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून दर रोज नवे जुने प्रक्षोभक विडीओ टाकले जाते त्या पोस्ट आणि कामेंट्स मुळे सुद्धा जातिय तेढ निर्माण होऊन दंगली होतात म्हणून हिंदू मुस्लिम पोस्ट करणाऱ्यांवर एकदम कठोर कारवाईचा कायदा करून



त्यावर सक्तीने अंमल करण्यात यावे, भारतात अनेक ठिकाणी हिंदू मुस्लिम सख्खे भाऊ भाऊ सारखे मिळुन मिसळून राहत आहेत हे आमच्यासाठी सर्वात मोठं अभिमा आहे, तरीपण काही जातीयवादी लोक दर रोज मुस्लिम समाजाच्या व मुस्लिम धार्मिक गुरु महापुरुषांच्या व धर्मावर घरणास्पद शब्दाचा उपयोग करून मुस्लिम समाजाला मानसिक त्रास देत आहेत, काही कट्टर हिंदुत्ववादी संघटना मुस्लिम समाजाला गावाबाहेर काढण्याची भाषा करताहेत व मुस्लिम समाजासोबतचे व्यवहार बंद करण्याचे फतवे काढताहेत म्हणून मुस्लिम समाजाच्या संरक्षणासाठी एस.सी.एस.टी. सारखा कायदा मुस्लिम समाजासाठी करण्यात यावा अशी विनंती पुर्वक मागणी बीड नगरपरिषदेचे माजी सभापती तथा शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी महाराष्ट्राचे सन्माननीय राज्यपाल यांच्या मार्फत भारताचे सन्माननीय राष्ट्रपतींकडे केली आहे, यावेळी ऑल इंडिया ओबीसी ऑर्गनायझेशन बीड जिल्हाध्यक्ष शेख जाकेर भाई, शेख हमीद भाई, हकीम भाई मन्यार, रफु सेठ,शहेबाज भाई वगैरे उपस्थित होते,

# पालकमंत्री धनंजय मुंडेंचे बीड जिल्हा वासीयांना मोठे गिफ्ट

## यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून बीड जिल्ह्यात तब्बल २८ हजार घरकुलांना शासनाची मंजुरी

जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर घरकुलांना मंजुरी!

मुंबई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी बीड जिल्हा वासीयांना ऐन सणासुदीच्या काळात मोठे गिफ्ट दिले असून, इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून जिल्ह्यासाठी तब्बल २८ हजार घरकुले मंजूर करण्यात आली आहेत.

याबाबतचे शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आले आहेत. यामध्ये एका शासन निर्णयाद्वारे १७०८१ तर दुसऱ्या शासन निर्णयाद्वारे ९९४१ अशा एकूण २८ हजार घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. तर पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री श्री अतुल सावे यांचे याबद्दल आभार मानले आहेत.

विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील गरजू नागरिकांना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतुन स्वतःचे पक्के घर बांधण्यासाठी १ लाख २० हजार रुपये निधी दिला जातो. बीड जिल्ह्यातील तालुकानिहाय प्राप्त प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवण्याबाबत जिल्हास्तरीय समितीने निर्णय घेऊन प्राप्त प्रस्तावांची यादी राज्य शासनास सादर केली, त्यानुसार पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून तब्बल २८ हजार घरकुलांना एकाच वेळी मंजुरी देण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यात तालुकानिहाय आकडेवारी पाहता, घरकुलांसाठी एकत्रित पणे इतक्या मोठ्या प्रमाणात घरकुल मंजूर करण्यात आले आहेत, धनंजय मुंडे यांच्या आग्रही भूमिकेमुळे हे होऊ शकले, असे बोलले जात आहे.जिल्ह्याच्या इतिहासात इतक्या मोठ्या संख्येने एका योजनेतून घरकुलांना मंजुरी मिळण्याची ही पहिलीच वेळ असून, यामध्ये सर्व तालुक्यांना न्याय देण्यात आला आहे.



# पाच वर्षात जमलं नाही ते विजयसिंहांनी महिनाभरात करुन दाखविले गेवराई तालुक्यातील १२०६० निराधारांचे अर्ज मंजुर

## समितीचे अध्यक्ष दादासाहेब घोडके यांची माहिती

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील निराधारांच्या प्रश्नांवर सातत्याने राजकीय पोळी भाजण्याचे काम आजवर सत्ताधाऱ्यांकडुन होत होते. राज्यातील सत्तांतरानंतर विजयसिंह पंडित यांनी राजकीय प्रतिष्ठापणाला लावुन संजय गांधी निराधार अनुदान समितीचे गठण केले. दादासाहेब घोडके यांच्या अध्यतेखालील समिती कार्यरत होताच त्यांनी अतिशय तत्परतेने निराधारांची प्रकरणे हाताळली. प्रशासकीय यंत्रणेला समिती सदस्यांनी अक्षरशः खांद्याला खांदा देवुन दिवसरात्र एक करत गेवराई तालुक्यातील प्राप्त झालेल्या १५६३० एकुण अर्जाची बारकाईने तपासणी करुन १२०६० अर्ज मंजुर करत खऱ्या अर्थाने निराधारांना न्याय देण्याचे काम केले. विरोधकांना सत्तेत असतांनाही पाच वर्षात जे जमलं नाही ते विजयसिंह पंडित यांनी महिण्याभरात करुन दाखविल्याची चर्चा गेवराई तालुक्यात आहे.

गेवराई तालुक्यातील निराधारांचा प्रश्न सातत्याने ऐरणीवर आला की, त्यावर राजकीय वाद आजवर होत आले आहेत. केलेल्या कामाचे श्रेय घेण्यासाठी अक्षरशः विधवा, दिव्यांग आणि निराधारांना तहसिल कार्यालयात बोलावुन आमदारांच्या हाताने मंजुरी पत्र वाटप करण्याचे केविलवाने प्रकारही आजवर गेवराईत घडलेले आहेत. निराधारांमध्ये सुद्धा राजकारण करुन विशिष्ट गटाच्या लोकांना प्राधान्य देण्याचे प्रकार यापुर्वी घडले होते. लाच घेवुन अर्ज मंजुर केलेल्याचे आरोप यापुर्वीच्या समितीवर मोठ्या प्रमाणावर झाले. बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी मोठा मोर्चा काढुन या प्रश्नाला वाचा फोडली होती. शेवटी राज्यातील सत्तांतरानंतर त्यांनी राजकीय प्रतिष्ठापणाला लावुन पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या माध्यमातुन नविन समिती गठीत केली. दादासाहेब घोडके यांच्या अध्यक्षतेखाली नवनियुक्त समिती



सदस्यांनी प्रयत्नांची पराकाष्टा करत तहसिल कार्यालयात आजवर प्रलंबित असलेल्या सुमारे १५६३० अर्जाची प्रत्यक्ष तपासणी केली.

गेवराई तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीने दि. २० सप्टेंबर रोजीच्या बैठकीत १२०६० अर्ज मंजुर केले आहेत. 'यामध्ये श्रावण बाळ निराधार ६८७४, संजय गांधी निराधार ५१५४ आणि इंदिरा गांधी वृद्धपकाळ निराधार योजने मधील ३२ अर्जाचा समावेश आहे. एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणावर अर्ज मंजुर करण्याची गेवराई तालुक्यातील ही पहिलीच घटना आहे. समिती सदस्यांनी लाभार्थ्यांकडुन कोणतीही अपेक्षा न ठेवता प्रामाणिकपणे काम केले आहे. त्यामुळे विरोधकही आमच्यावर आरोप करु शकत नाहीत. तालुक्यातील निराधारांना यामुळे खऱ्या अर्थाने न्याय मिळाल्याची भावना समितीचे अध्यक्ष दादासाहेब घोडके यांनी व्यक्त केली. त्यांनी पालकमंत्री ना. धनंजय मुंडे, माजी आ. अमरसिंह पंडित आणि बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांचे आभार व्यक्त केले. यावेळी समितीचे सदस्य ज्ञानेश्वर नवले, सरवर पठाण, भारत गर्जे, बळीराम शिंदे, गोकुळ चोरमले, शाहीन पठाण, अनिरुद्र तौर, अंबादास सांगळे, शामसुंदर शिंदे आर्दीची उपस्थिती होती. गेवराई तालुक्यातील निराधारांकडुन आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

# रस्त्यावरील अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी धनंजय मुंडे धावले

## स्वतःच्या ताफ्यातील वाहन हॉस्पिटल मध्ये पोहोचवण्यासाठी दिले ; अपघातग्रस्तांना घाटी रुग्णालयात उपचारासाठी मुंडेंच्या सूचना

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

कृषी मंत्री धनंजय मुंडे हे आज छत्रपती संभाजीनगर येथील कामकाज आटोपून समृद्धी महामार्गाने मुंबईकडे जात असताना संभाजीनगर शहरालगतच्या हरसुल-सावंगी या या टोल नाक्याजवळ झालेल्या अपघातात जखमी झालेल्या लोकांच्या मदतीसाठी धनंजय मुंडे धावले. धनंजय मुंडे हे समृद्धी महामार्गाकडे जात असताना त्यांना अपघात झाल्याचे लक्षात आले. एक पुरुष व एक महिला मोटरसायकल वरून जात असताना एका वाहनाने त्यांना जोराची धडक दिली, त्यात दोघेही जखमी झाले असून त्यांच्या शरीरातून मोठा रक्तस्राव होत होता.

धनंजय मुंडे यांनी तातडीने आपल्या वाहनांचा ताफा थांबवला. स्वतःचा स्टाफ आणि जवळ आज उभ्या असणाऱ्या माणसांच्या मदतीने या जखमींना आपल्या ताफ्यातील सुरक्षेचे पोलीस वाहन उपलब्ध करून दिले व गाडीत रुग्णांना घेऊन तातडीने घाटी हॉस्पिटलमध्ये जाण्याची सूचना केली.माझ्यासोबत सुरक्षा साठी वाहन नसले तरी चालेल मात्र आधी या जखमींना घेऊन हॉस्पिटलमध्ये जा, अशी सक्त ताकीदच त्यांनी वाहनचालकाला दिली. तसेच तातडीने घाटे रुग्णालयातील अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुकरे यांना फोन करून जखमींना योग्य ते उपचार करण्याच्या सूचनाही मुंडेंनी दिल्या.

या दांपत्याला धडक देऊन निघून गेलेल्या गाडीचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत स्थानिक पोलिसांनाही धनंजय मुंडे यांनी सूचना दिल्या आहेत.धनंजय मुंडे हे एक संवेदनशील व्यक्तिमत्व असून अशा प्रसंगी तातडीने मदतीला जाण्याबाबत ते नेहमीच तत्पर असतात, त्याची प्रचिती आज पुन्हा एकदा आली.

# अरविंद शिरगुळे यांना बीड जिल्ह्याच्या वतीने जाहीर पाठींबा

शाम अडागळे

बीड :- जालना जिल्ह्यातील अंबड येथे मातंग समाजाच्या विविध मागण्यासाठी साखळी उपोषणाला बसलेले अरविंद भाऊ शिरगुळे यांना जाहीर पाठींबा म्हणून बीड जिल्ह्यातील मातंग समाजातील सक्रीय कार्यकर्त्यांच्या कमीटीने आज दि. ०९/१०/२०२४ रोजी अंबड येथे भेट दिली.अरविंद भाऊ यांनी मातंग समाजाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण करणाची अंमलबजावणी करण्यातयावी,साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न देण्यात यावा, क्रांती गुरु लहुजी वस्ताद साळवे अभ्यास आयोगाची अंमलबजावणी करण्यात यावी,साठे नगर अंबड येथील वस्ताद लहुजी स्मारकाची जागा तात्काळ मान्य करण्यात यावी,डॉ. अण्णाभाऊ साठे यांचे नाव मुंबई विद्यापीठाला देण्यात यावे, मातंग समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचारासाठी शस्त्र परवानगी देण्यात यावी,अंबड येथीन फुले नगर, विकास नगर, इंद्रा नगर, बाजार पटटी, व इतर सर्व घरे नामांत्रीत करण्यात यावे अश्या विविध मागण्यासाठी उपोषण दि ०२ /१०/२०२४ रोजी सुरु केले असून आज त्यांना आठ दिवस झाले आहे.तरीही अंबडचे तहसीलदार यांनी उपोषण स्थळी भेट दिली नाही यामुळे अंबड तलाक्यातील मातंग समाजात तीव्र नाराजी असून अंबड तहसीलदार हे जातीयवादी असल्याचे दिसून येत आहे.




तसेच जालना जिल्यातील विविध संघटना सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते उपोषण स्थळी शिरगुळे यांची भेट घेत आहेत.परंतु एक मातंग समाजाचा युवक समाजाच्या विविध मागण्या पूर्ण कराव्यात यासाठी उपोषण करतोय असे असताना जालना जिल्ह्यातील आमदार,खासदार, किंवा प्रशासनाचा कुठलाही अधिकारी उपोषण स्थळी आला नाही यावरुन स्पष्ट होते की इतर समाजाचा कोणी जर उपोषण करत असेल तर त्याच्या उपोषणास भेट देण्यासाठी मंत्री, आमदार, जिल्हाधिकारी, असे अनेक लोकं भेट देतात परंतु मातंग समाजाच्या उपोषणाची या लोकांना ऍलर्जी का आहे असा प्रश्न मातंग समाज विचारत आहे.तसेच सरकारला मातंग समाजाची गरज नाही असे चित्र दिसत आहे.बीड जिल्ह्यातील मातंग समाजाने आता ठरवले आहे जर सरकारने वेळीच उपोषणाची भेट घेऊन मागण्या मान्य नाही केल्या तर येणाऱ्या विधानसभेला मातंग समाजाची ताकद काय आहे हे दाखविल्या शिवाय राहणार नाही असे समस्त मातंग समाजात बोलले जात आहे.आज अरविंद भाऊ शिरगुळे यांची भेट घेतली यावेळी उपस्थित काशिनाथ आडागळे, प्रकाश धुताडमल,पत्रकार शाम आडागळे,राजु नाडे,पत्रकार संचार उमाप,भगवान आडागळे,विकास धुताडमल संजय काते व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात मातंग समाजाच्या विविध मागण्यांसाठी उपोषणास बीड जिल्ह्याच्या वतीने जाहीर पाठींबा

शाम अडागळे

बीड :- जालना जिल्ह्यातील अंबड येथे मातंग समाजाच्या विविध मागण्यासाठी साखळी उपोषणाला बसलेले अरविंद भाऊ शिरगुळे यांना जाहीर पाठींबा म्हणून बीड जिल्ह्यातील मातंग समाजातील सक्रीय कार्यकर्त्यांच्या कमीटीने आज दि. ०९/१०/२०२४ रोजी अंबड येथे भेट दिली.

अरविंद भाऊ यांनी मातंग समाजाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण करणाची अंमलबजावणी करण्यातयावी,साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न देण्यात यावा, क्रांती गुरु लहुजी वस्ताद साळवे अभ्यास आयोगाची अंमलबजावणी करण्यात यावी,साठे नगर अंबड येथील वस्ताद लहुजी स्मारकाची जागा तात्काळ मान्य करण्यात यावी,डॉ. अण्णाभाऊ साठे यांचे नाव मुंबई विद्यापीठाला देण्यात यावे, मातंग समाजावर होणाऱ्या अन्याय



अत्याचारासाठी शस्त्र परवानगी देण्यात यावी,अंबड येथीन फुले नगर, विकास नगर, इंद्रा नगर, बाजार पटटी, व इतर सर्व घरे नामांत्रीत करण्यात यावे अश्या विविध मागण्यासाठी उपोषण दि ०२ /१०/२०२४ रोजी सुरु केले असून आज त्यांना आठ दिवस झाले आहे.तरीही अंबडचे तहसीलदार यांनी उपोषण स्थळी भेट दिली नाही यामुळे अंबड तलाक्यातील मातंग समाजात तीव्र नाराजी असून अंबड तहसीलदार हे जातीयवादी असल्याचे दिसून येत आहे.

तसेच जालना जिल्यातील विविध संघटना सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते उपोषण स्थळी शिरगुळे यांची भेट घेत आहेत.परंतु एक मातंग समाजाचा युवक समाजाच्या विविध मागण्या पूर्ण कराव्यात यासाठी उपोषण करतोय असे असताना जालना जिल्ह्यातील आमदार,खासदार, किंवा प्रशासनाचा कुठलाही अधिकारी उपोषण स्थळी आला नाही यावरुन स्पष्ट होते की इतर समाजाचा कोणी जर उपोषण करत असेल तर त्याच्या उपोषणास भेट देण्यासाठी मंत्री, आमदार, जिल्हाधिकारी, असे अनेक लोकं भेट देतात परंतु मातंग समाजाच्या उपोषणाची या लोकांना ऍलर्जी का आहे असा प्रश्न मातंग समाज विचारत आहे.तसेच सरकारला मातंग समाजाची गरज नाही असे चित्र दिसत आहे.बीड जिल्ह्यातील मातंग समाजाने आता ठरवले आहे जर सरकारने वेळीच उपोषणाची भेट घेऊन मागण्या मान्य नाही केल्या तर येणाऱ्या विधानसभेला मातंग समाजाची ताकद काय आहे हे दाखविल्या शिवाय राहणार नाही असे समस्त मातंग समाजात बोलले जात आहे.आज अरविंद भाऊ शिरगुळे यांची भेट घेतली यावेळी उपस्थित काशिनाथ आडागळे, प्रकाश धुताडमल,पत्रकार शाम आडागळे,राजु नाडे,पत्रकार संचार उमाप,भगवान आडागळे,विकास धुताडमल संजय काते व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# बीडच्या रेल्वे स्थानकाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव केंद्र, राज्य सरकारच्या बापाला ही द्यावेच लागणार?

## प्रशांत वासनिक प्रेम कांबळे रजनीकांत वाघमारे कोमलताई तुरुकमारे बाबासाहेबांच्या आम्ही सदैव लढा चालूच ठेवणार?.





बीड : बीड रेल्वे स्थानकाला विश्वरत्न तथा जगात बलाढ्य लोकशाही असलेल्या भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे, यासाठी मागीलएक महिन्यांपासून शांततेच्या मार्गाने भीम अनुयायांनी आंदोलन सुरू केले आहे. परंतु वेळोवेळी शांततेच्या मार्गाने असलेले हे आंदोलन पोलीस कधी धमकावून तर कधी

बळाचा वापर करून चिरडून का टाकत आहेत? बीड पोलीस नेमके कोणाच्या आदेशाचे गुलाम आहेत? हे अद्याप स्पष्ट झाले नसले तरी भविष्यात हे भयान वास्तव समोर येईलच ! परंतु, पोलिसांच्या या भूमिकेचा बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर उभ्या महाराष्ट्रातून भिम अनुयायी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केल्याच्या प्रतिक्रिया असून संतप्त भावना निर्माण झाल्या आहेत. एकूणच या मागणीच्या अनुषंगाने दुर्दैवाची बाब अशी की, भीमाची काही लाचार लेकरं घराच्या बाहेर सुद्धा पडली नाहीत!' भीमा तुझ्या मताचे जरपाच लोक असते ! तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते !!' या वामनदादा कर्डक यांच्या काव्याच्या ओळी समाजातील आजचे भयान वास्तव दर्शवणाऱ्या ठरल्या आहेत.

नेते नाही आले तरी चालतील परंतु, अनुयायांनो तुम्ही रस्त्यावर या : कांबळे

बीड रेल्वे स्थानकाला महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव दिलेच पाहिजे, यासाठी तमाम आंबेडकरी अनुयायी अग्रेसर असून प्रयत्नशील आहेत, त्या अनुषंगाने मागील एक महिन्यापासून लोकशाही मार्गाने अत्यंत शांततेमध्ये आंदोलन सुरू करण्यात आले आहे. दरम्यान या आंदोलनाला चिरडण्याचा प्रयत्न पोलीस प्रशासनाच्या अडून केला जात आहे. महामानवाला विरोध करणारे अद्याप तरी समोर आले नाहीत. परंतु, लवकरच त्यांच्या चेहऱ्यावरील बुरखा फाटला जाणार आहे. तेव्हा भलेही या लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनात दलित नेते उत्तरले नसले तरी अनुयायांनी मात्र यामध्ये सहभागी व्हावे, असे नम्र आवाहन प्रेम धर्मेंद्र कांबळे यांनी केले आहे.

### प्रशांत वासनिक. रजनीकांत वाघमारेना पेठ बीड ठाण्यात बसवून का ठेवले?

दि.०९ ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजित केलेल्या बीड शहरातील मोर्चाला बीड पोलीस प्रशासनाने जाणीवपूर्वक खोडा घालण्याचं काम केलं होतं. मोर्चाच्या दिवशी सकाळी ०७ वाजेपासून ते सायंकाळी ०४ वाजेपर्यंत प्रशांत वासनिक व रजनीकांत वाघमारे या दोघांना पेठ बीड पोलीस स्टेशन या ठिकाणी स्थानबद्ध केलं होतं. सायंकाळी ०४ वाजता पोलिसांनी या दोघांची सुटका झाल्याचे सांगितले असता मोर्चाच्या पुढील तारखेची परवानगी पोलीस अधीक्षक यांनी देण्याचे सांगितल्या शिवाय पोलीस स्टेशन मधून परत जाणार नाहीत असे प्रशांत बसणे यांनी सांगितले व पोलीस स्टेशनमध्ये असेपर्यंत अन्न पाणी घेणार नाहीत असा दोघांनीही निर्णय घेतला होता. परंतु रात्री नऊच्या सुमारास पोलीस अधीक्षक यांनी पुढील तारखेला परवानगी देऊ असा शब्द दिल्यानंतर प्रशांत वासनिक व रजनीकांत वाघमारे पोलीस स्टेशन मधून घरी परतले.

प्रोटोकॉलनुसार पोलिसांनी आंदोलनाला सहकार्य केले पि आय अशोक मोदीराज पेठ बीड पोलीस ठाणे राज्यपालांचा बीड दौरा असल्यामुळे आणि त्यांच्या एकंदरीत झेड प्लस सुरक्षेनुसार पोलिसांनी आंदोलनाला सहकार्यच केले आहे. पोलिसांनी बळाचा वापर केला नाही किंवा आंदोलन चिरडण्याचाही प्रयत्न केला नाही. या सगळ्या अफवा आहेत. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलिसांनी प्रोटोकॉल नुसार आंदोलनाला सहकार्य केले आहे आणि यापुढेही राहील.

अशोक मोदीराज,
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेठबीड पोलिस ठाणे

# भगवान भक्ती गडावरील दसरा मेळाव्याची तयारी पूर्ण



प्रतिनिधी । बीड

गुढी उभारून सावरगाव घाट मध्ये आमदार पंकजाताई मुंडे यांचे करणार स्वागत : बीडः भगवान भक्ती गड, सावरगाव घाट येथे आमदार पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत होणाऱ्या भव्य दसरा मेळाव्याची तयारी पूर्ण झाली असून आमदार पंकजाताई मुंडे यांचे सावरगाव घाट गावकरी गावांमध्ये गुढ्या उभारून भव्य मिरवणूकीने स्वागत करणार आहेत. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांनी समाजातील वंचित, शोषित, दुर्लक्षित बहुजनांच्या व्यथांना मांडणार विचारपीठ दसरा मेळाव्याच्या माध्यमातून उभारले होते.

साहेबांनी स्थापित केलेल्या या विचारपीठावर बहुजनांच्या प्रश्नांवर आवाज उठवणारे अनेक व्यक्ती आजपर्यंत आले आहेत, साहेबांपश्चात हे विचारपीठ लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांनी यथोचित चालवले आहे, आपलेही स्वागतच आहे कारण हा दसरा राज्यातील त्या घटकाचा ज्यांचा कोणी वाली आणि वाणी नाही.. इथे कोणालाही निमंत्रण नसते सर्वजण आपोआप येतात.येथे सर्वांचेच स्वागत केले जाते..

भगवान भक्ती गडावर होणाऱ्या दसरा मेळाव्याच्या तयारीच्या माहितीसाठी संयोजन समितीचे सर्व स्वयंसेवक कार्यकर्ते यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये दसरा मेळाव्याची तयारी पूर्ण झाल्याची माहिती दिली. सर्जेराव तांदळे पि. टी. चव्हाण, माधवराव निर्मळ, अण्णासाहेब मतकर, राजाभाऊ अण्णा मुंडे, नवनाथ आण्णा शिराळे, विक्रांत हजारी, देविदास नागरगोजे, अशोक लोढाजी, सलीम जहांगीर, चंद्रकांत फड, संगीताताई धसे, डॉ. लक्ष्मण जाधव, इरशाद शेख, कल्याण आबुजजी, किरण आबा बांगर, दीपक मुंडे, शांतीनाथ डोरले, अनिल चांदणे, विलास बामणे, ओमप्रकाश गिरी दादासाहेब नंनवरे, यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या पत्रकार परिषदेत भगवान भक्ती गडावर होणाऱ्या मेळाव्याच्या तयारीची माहिती देण्यात आली.संतश्रेष्ठ भगवान बाबा यांचे जन्मगाव असणाऱ्या सावरगाव घाट येथे आमदार पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये महाराष्ट्रातील अठरापगड जातीचा जनसमुदाय एकत्रित येऊन विचाराचे सोने लुटण्याचे काम गेली अनेक वर्षांपासून करतात

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT